केंद्र सरकारचे 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान' राज्यात राबविण्यास मंजुरी; फडणवीस सरकारचा मोठा निर्णय >>पान 2

भिजलेला माणूस कुणाला घाबरत नाही, धमकी काय देता, जे काय करायचे ते करुन टाका; निलेश राणे मनातले सगळे बोलून गेले! >>पान 3

लोणारच्या सर्वांगीण विकासासाठी शिंदे गट शिवसेनेलाच सत्ता द्या : केंद्रीय मंत्री जाधव >>पान 4

**सुविचार**

अंधश्रद्धेने मूर्ख बनण्यापेक्षा नास्तिक परवडला.- स्वामी विवेकानंद



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 113 ■ शनिवार, दि. 29 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

चांगले स्वास्थ्य हीच खरी ताकद - अभिनेता अक्षय कुमार

आतील पान

# स्थानिक निवडणुकांना कोणताही ब्रेक नाही

## पण ४० नगरपरिषदा, १७ नगरपंचायतींचा निर्णय अंतिम निर्णयाच्या अधीन राहील; सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडल्याच्या मुद्द्यावर आज पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. राज्य निवडणूक आयोगाने ४० नगरपरिषद आणि १७ नगरपंचायतींमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देण्यात आल्याची कबुली दिल्यानंतर हा वाद अधिकच गंभीर बनला होता. मात्र, आजच्या सुनावणीत भारताचे मुख्य न्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने स्पष्ट आदेश दिला की, या प्रक्रियेत कोणत्याही निवडणुकीला स्थगिती देण्यात येणार नाही.**



त्यामुळे २८८ नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घोषणेप्रमाणेच होतील; मात्र आरक्षणाचा वाद असलेल्या सर्व निवडणुकांचा अंतिम निकाल कोर्टाच्या अंतिम निर्णयाच्या आदेशाधीन राहील.

बांठिया आयोगाचा अहवाल

सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले की मनपा, जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांमध्ये अनावश्यक विलंब होऊ नये. त्यांनी मांडले की ५० टक्क्यांच्या आरक्षण मर्यादेवरील सर्वोच्च न्यायालयाचा पूर्वीचाच निर्णय अद्याप लागू आहे आणि कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था ही मर्यादा ओलांडू शकत नाही. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने आजच्या स्थितीत तात्पुरता उपाय म्हणून बांठिया आयोगाचा अहवाल 'बेंचमार्क' मानण्याचा निर्णय घेतला.

हा अहवाल मागील सरकारच्या काळात तयार करण्यात आला होता; परंतु अनेक ओबीसी संघटनांनी त्याच्या वैधतेवर तीव्र आक्षेप नोंदवले आहेत. त्यावर सरन्यायाधीशांनी म्हटले की, या अहवालाची कायदेशीरता आणि विश्वसनीयता यावर पुढील सुनावणीत स्वतंत्रपणे सविस्तर चर्चा करण्यात येईल.

सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी हेही नमूद केले की, आजपर्यंत न्यायालयाच्या आदेशांचा चुकीचा अर्थ काढला गेला आणि या गोंधळामुळे अनेक गैरसमज निर्माण झाले. त्यांनी असेही सांगितले की तात्पुरती व्यवस्था लागू करताना अंतिम निर्णयासाठी स्वतंत्र खंडपीठाची आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांनी हे संपूर्ण प्रकरण तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे पाठवण्याचा निर्णय घेतला.

या खंडपीठासमोर पुढील सुनावणी २१ जानेवारी रोजी होणार आहे. या सुनावणीमध्ये आरक्षणाच्या मर्यादा, बांठिया आयोगाची वैधता, ओबीसी आरक्षणाच्या गणितासह सर्व मुद्द्यांवर निर्णायक चर्चा अपेक्षित आहे.

दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने न्यायालयासमोर सांगितले की, आगामी निवडणुकांसाठी मतदार संघ पुनर्रचना, आरक्षण प्रभाग आणि मतदार यादी तयार करण्याची सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यानुसार २ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकांची तयारी पूर्ण असून विलंबाची कोणतीही गरज नाही. न्यायालयानेही या मताला मान्यता देत निवडणुका न थांबवण्याचा निर्णय कायम ठेवला.

एकूणच, सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला असला तरी आरक्षणाच्या गंभीर वादाचा अंतिम निकाल आता २१ जानेवारीच्या सुनावणीनंतरच स्पष्ट होणार आहे. आगामी महिन्यांत महाराष्ट्रातील स्थानिक राजकारणाचे गणित या निर्णयावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे.

## नाशिकचा पालकमंत्री का नेमला जात नाही? उद्धव ठाकरेंचा सरकारला सवाल



**नाशिक/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १८ जानेवारी रोजी पालकमंत्र्यांच्या नियुक्तीची घोषणा केली होती. यामध्ये नाशिक जिल्ह्यासाठी भाजप नेते गिरीश महाजन यांची पालकमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, या निर्णयाला शिंदे गटातील नेत्यांकडून विरोध झाल्यामुळे अवघ्या एका दिवसातच नाशिकच्या पालकमंत्रिपदाची घोषणा स्थगित करण्यात आली. यानंतर अद्याप महायुतीत नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा तिढा कायम आहे. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सरकारवर निशाणा साधलाय. तर नाशिकमध्ये २०२७ साली होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याची मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू आहे. या कुंभमेळ्यात साधू-महंतांना राहण्यासाठी तपोवन परिसरात ११५० एकरांवर साधूग्राम उभारण्यात येणार आहे. त्यासाठी १८०० झाडांची कत्तल केली जाणार आहे. यामुळे परिसरातील नागरिक आणि पर्यावरणप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली असून उद्धव ठाकरे यांनी देखील या प्रकरणावरून राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केलाय. उद्धव ठाकरे म्हणाले की, नाशिकमध्ये पुढच्या वर्षी कुंभमेळा होत आहे. कुंभमेळा व्हायला पाहिजे. कारण गेल्या अनेक वर्षांपासून कुंभमेळा होत आहे. गेल्यावेळी देखील तिथे कुंभमेळा झाला होता. तिथे येणारे हजारो-लाखो साधू संत आणि भाविकांची गैरसोय होता कामा नये. त्यासाठी सुविधा पुरवण्याचे काम हे >>पान २

## महाराष्ट्र प्रशासनात मोठा बदल; राजेश अग्रवाल यांची मुख्य सचिवपदी नियुक्ती



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची धामधूम सुरू आहे. तर, दुसरीकडे प्रशासनातील एका मोठ्या निर्णयाची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. महाराष्ट्राच्या प्रशासनात एक महत्त्वाचा बदल म्हणजे राज्याला नवे मुख्य सचिव मिळाले आहेत. केंद्रात प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले वरिष्ठ आयएएस अधिकारी राजेश अग्रवाल यांची आज (दि. २८) महाराष्ट्राचे नवे मुख्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सध्या निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेले मुख्य सचिव राजेश कुमार (आयएएस १९८८) यांचा कार्यकाळ नोव्हेंबर अखेरीस संपत असून, अग्रवाल त्यांचे उत्तराधिकारी ठरणार आहेत. कुमार यांचा कार्यकाळ याआधी तीन महिन्यांनी वाढवण्यात आला होता. पुढील दोन दिवसांत अग्रवाल पदभार स्वीकारणार असल्याचे सामान्य प्रशासन विभागाने स्पष्ट केले आहे.

राज्य प्रशासनातही महत्त्वाची कामगिरी

राजेश अग्रवाल (आयएएस १९८९) हे जवळपास एक दशकापासून केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांमध्ये काम करत आहेत. त्यांनी वित्तीय सेवा, आदिवासी विकास, कौशल्य विकास, पेट्रोलियम आणि सामाजिक न्याय मंत्रालयातील जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. अलीकडे ते सामाजिक न्याय मंत्रालयाच्या अपंग व्यक्ती विभागाचे सचिव होते. राज्य प्रशासनातही अग्रवाल यांनी महत्त्वाची कामगिरी केली असून, अकोल्याचे जिल्हाधिकारी, तसेच माहिती तंत्रज्ञान, लेखा व कोषागार विभागांमध्ये त्यांनी उल्लेखनीय भूमिका निभावली आहे. त्यांचा निवृत्तीचा कालावधी नोव्हेंबर २०२६ आहे.

तंत्रज्ञानाची प्रभावी पकड

राजेश अग्रवाल यांनी आयआयटी दिल्ली येथून संगणकशास्त्रात बी.टेक केले आहे. प्रशासकीय सेवेत रुजू झाल्यानंतरही त्यांनी शासन व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावी वापर कसा करता येईल, यावर सातत्याने लक्ष केंद्रित केले. तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजना आणि आधुनिक प्रशासन या दोन्हींचा समन्वय साधण्याचा त्यांचा प्रयत्न नेहमीच ठळकपणे दिसून आला आहे. अग्रवाल यांची नियुक्ती झाल्यानंतर १९८९, १९९० आणि १९९१ बॅचमधील काही वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांना मुख्य सचिवपदाची संधी गमवावी लागू शकते, अशी चर्चा सूत्रांमध्ये आहे.

## कुर्ला बस स्थानकावर १४ वर्षीय मुलाच्या लैंगिक छळप्रकरणी एकाला अटक

**मुंबई/प्रतिनिधी :** कुर्ला बस स्थानकावर अल्पवयीन मुलाचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी ३५ वर्षीय आनंद बाळू जाधव याला विशेष पोक्सो न्यायालयाने तीन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. विशेष न्यायाधीश पी. एन. राव यांनी दिलेल्या निकालात पीडित मुलाची साक्ष विश्वासार्ह ठरली असून तीच गुन्हा सिद्ध करण्यासाठी पुरेशी असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने म्हटले की पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्ह्यांमध्ये पीडिताची साक्षदेखील ठोस पुरावा ठरू शकते. आरोपीने मुलावर लैंगिक हेतूने अयोग्य स्पर्श केला आणि अश्लील शब्द वापरल्याचे न्यायालयाला पटले. जाधव याला पोक्सो कायद्याच्या कलम ८ (लैंगिक अत्याचार) आणि कलम १२ (लैंगिक छळ) अंतर्गत दोषी ठरवण्यात आले.

## निवडणूक सुधारणा यादीचा ताण, फक्त २० दिवसांत तब्बल २६ बूथ लेव्हल ऑफिसरांकडून आयुष्याचा शेवट

कोलकाता : मतदार यादी सुधारणा वरून मानसिक ताण सहन न झाल्याने आतापर्यंत देशात तब्बल २५ बूथ लेव्हल ऑफिसरांनी गळफास घेत आत्महत्या केली आहे. त्यामुळे देशभरात अधिकाऱ्यांमध्ये दहशतीचं वातावरण आहे. या प्रक्रियेभोवती सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, तृणमूल काँग्रेसच्या ५ सदस्यांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी दिल्लीत निवडणूक आयोगाची भेट घेतली. शिष्टमंडळात डेरेक ओ'ब्रायन आणि कल्याण बॅनर्जी यांचा समावेश होता. >>पान २

### तृणमूल शिष्टमंडळ निवडणूक आयोगाच्या भेटीला



## युनेस्को मुख्यालयात संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण

– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुढाकार

– भारतीयांसाठी अत्यंत अभिमानाचा, अपूर्व क्षण



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाने युनेस्कोच्या मुख्यालयाला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा भेट म्हणून दिला होता. या पुतळ्याचे अनावरण करण्यात आल्याने युनेस्कोच्या पॅरिसमधील मुख्यालय प्रांगणात संविधान दिनीच डॉ. आंबेडकर यांचा पुतळा दिमाखात उभा राहिला.

'हा क्षण तमाम भारतीयांसाठी अभिमानाचा असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युनेस्कोशी संबंधित सर्व पदाधिकारी, वरिष्ठाधिकारी यांचे आभार मानले आहेत. ते म्हणतात, 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विद्वत्तेने आणि प्रतिभेने जगाला समता-बंधुता आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा दिली. भारताला मिळालेले संविधान हे त्यांच्या उत्तुंग अशा कर्तृत्वाचा अविष्कार आहे. अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे संविधान दिनीच अनावरण हे जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही राष्ट्राला मिळालेल्या संविधानप्रती व्यक्त झालेला परमोच्च आदराचा क्षण आहे. आम्ही हा क्षण महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती अभिवादनाची संधी मानतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि हा पुतळा उभा रहावा, यासाठी प्रयत्नशील अशा सर्वांचे अभिनंदनही करतो. यानिमित्ताने सर्व नागरिकांना शुभेच्छा देतो, >>पान २




## एक कॉल प्रॉब्लेम सॉल्व्ह, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रचाराची न्यू स्टाईल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात नगरपंचायत आणि नगर परिषद निवडणुकीचा धुरळा उडाला आहे. सर्वच राजकीय पक्षातील प्रमुख नेते राज्यभर जाहीर सभा घेत निवडणुकीचा प्रचार करत आहेत. शिवसेना शिंदे गटाने देखील प्रचारामध्ये जोरदार मुसंडी मारली आहे. या प्रचार दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भाषणाची नवीन स्टाईल पाहायला मिळाली. ज्या शहरामध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा असते, एकनाथ शिंदे तिथल्या समस्या जाणून घेतात आणि भाषणादरम्यानच थेट संबंधित मंत्र्याला फोन लावतात. तातडीने प्रश्न सोडवण्याची सूचना भाषणादरम्यानच करतात. यावेळी एकनाथ शिंदे



संबंधित मंत्र्याचा फोन लावून स्पीकरवर ठेवून सभेसाठी उपस्थित असणाऱ्या नागरिकांना मंत्र्यांचे आश्र्वासन ऐकवतात.

यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यामध्ये एमआयडीसीची गरज आहे... उपस्थित नागरिकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे एमआयडीसीची मागणी केल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी तातडीने उद्योग मंत्री उदय सामंत यांना फोन लावला. फोन लावून स्पीकरवर ठेवून उद्योग मंत्री उदय सामंत यांना एमआयडीसी बाबत सूचना दिल्या. त्यावेळी उद्योग मंत्री सामंत यांनी देखील लाऊड स्पीकर वरूनच उपस्थित त्यांना यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यात एमआयडीसी देण्याबाबत आश्र्वासन दिले. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाषणादरम्यान फोन लावला. संगमनेर येथील १०० बेडस हॉस्पिटल पुन्हा सुरू करण्याच्या सूचना दिल्या गेल्या. अनेक वर्षांपासून संगमनेर येथील शासकीय रुग्णालय बंद अवस्थेत आहे. त्यामुळे तिथल्या नागरिकांची गैरसोय होते... यामुळेच एकनाथ शिंदे यांनी आरोग्यमंत्र्यांना फोन लावून उपस्थित त्यांना आश्र्वासन दिले. वनी इथल्या भाषणादरम्यान प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष आणि शिवसेनेचे नेते सिद्धेश कदम यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फोन लावला वनी इथल्या प्रदूषणाबाबत तातडीने कारवाई करण्याची सूचना कदम यांना देण्यात आली. कदम यांनी देखील लाऊड स्पीकर वरून उपस्थित त्यांना प्रदूषण कमी करण्यासंदर्भातले आश्र्वासन दिले.

# केंद्र सरकारचे 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान' राज्यात राबविण्यास मंजुरी; फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र सरकारच्या 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान' राज्यात राबविण्यासंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. फडणवीस सरकारने या संदर्भात आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेत कडधान्य आत्मनिर्भरता अभियान राज्यात राबविण्यास मंजुरी दिली आहे. यात अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातील ३४ जिल्ह्यांची केंद्राकडून या अभियानासाठी निवड करण्यात आली आहे. बियाणे खरेदी व उत्पादनासाठी १०० टक्के मदत केंद्र सरकार करणार असल्याची माहिती आहे. तर उरलेल्या उपाययोजनांसाठी ही केंद्र सरकार ६० टक्के मदत देणार आहे. २०२५-२०२६ ते २०३०-३१ या पाच वर्षांत हे अभियान राबविले जाणार आहे. कडधान्य आयात कमी करत आत्मनिर्भरतेसाठी सरकारने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.



शासना निर्णयात नेमकं काय म्हटलंय?

राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानांतर्गत असलेला कडधान्य हा घटक वगळून चालू वर्षाच्या रब्बी हंगामापासून कडधान्य घटकासाठी स्वतंत्र कडधान्य आत्मनिर्भरता अभियान राबविण्याचे धोरण केंद्र शासनाने निश्र्चित केले आहे. नवनिर्मित केंद्र पुरस्कृत, कडधान्य आत्मनिर्भरता अभियान सन २०२५-२०२६ ते सन २०३०-३१ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. देशासाठी एकूण रु.११,४४० कोटीची तरतूद मंजूर केली आहे असून या अभियानांतर्गत राज्यातील ३४ जिल्ह्यांची निवड केली आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्याने, कडधान्य आत्मनिर्भरता अभियान राबविण्याचे धोरण निश्र्चित केले आहे. या अभियानास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेतले आहे.

- नवनिर्मित केंद्र पुरस्कृत कडधान्य आत्मनिर्भरता अभियान सन २०२५-२०२६ ते सन २०३०-३१ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. सदर अभियानाच्या अंमलबजावणीस या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

- कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत, कडधान्य या घटकाखाली मूलभूत बियाणे खरेदी व पायाभूत बियाणे उत्पादन या बाबी १००% केंद्र हिश्शयाच्या असून उर्वरित बाबींमध्ये केंद्र व राज्य हिश्शयाचे प्रमाण अनुक्रमे ६०:४० याप्रमाणे आहे.

-सदर अभियानाच्या अंमलबजावणीकरीता केंद्र व राज्य हिश्शयाचा निधी, प्रवर्गनिहाय ६०:४० प्रमाणात व १०० टक्के केंद्र हिश्शयाचा निधी वेळोवेळी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे, आयुक्त (कृषि) यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

-केंद्र शासनाने सदर अभियानांतर्गत विहित केल्याप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच, महिला शेतकरी लाभार्थ्यांना, सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात यावा.

-केंद्रीय कृषी मंत्रालयाने, सदर अभियानांतर्गत राज्य शासनास, सन २०२५-२६ करिता वाचा क्र.२ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार, तसेच, चालू वर्षी अभियानाकरिता मंजूर केलेल्या कृती आराखड्यानुसार आणि वेळोवेळी केंद्रीय मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार, सदर अभियानाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. याबाबत संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी राज्यस्तरावरून अभियानाचे संनियंत्रण करावे. त्याप्रमाणे अभियानाची प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रणाकरिता वेळोवेळी अधिनस्त कार्यालयांना निर्देशित करावे.

-सदर अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या वेळोवेळी प्राप्त सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

## चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती

गुवाहाटी येथे झालेल्या दुसऱ्या कसोटीत भारतीय क्रिकेट संघाला ४०० पेक्षा अधिक धावांनी नमवून दक्षिण आफ्रिकेने भारताला २ - ० असे नमवून व्हाइट वॉश दिला. क्रिकेट रसिकांसाठी हा पराभव धक्कादायक होता कारण पहिल्या कसोटीतही दक्षिण आफ्रिकेने भारताचा असाच लाजिरवाणा पराभव केला होता. या लाजिरवाण्या पराभवानंतर क्रिकेट प्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे आणि ते साहजिकही आहे कारण भारतीय भूमीवर झालेला हा भारताचा पहिलाच पराभव नाही. मागील वर्षी न्यूझीलंड संघानेही भारताचा असाच लाजिरवाणा पराभव करत मालिका ३ - ० ने जिंकत भारताला असाच व्हाइट वॉश दिला होता. वर्षभरात दोनदा परदेशी संघाने भारताला भारतात येऊन हरवले ते ही अतिशय लाजिरवाण्या पद्धतीने त्यामुळे क्रिकेट प्रेमींमध्ये नाराजीची भावना पसरली आहे. पूर्वी भारतात येऊन भारताला हरवणे हे परदेशी संघासाठी मोठे दिव्य होते. भारतीय भूमीवर भारत अपराजितच होता. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका अशा कोणत्याच संघाला भारतात येऊन मालिका विजय मिळविणे शक्य नव्हते. मालिकेतील एखादा दुसरा सामना ते जिंकायचे पण मालिका मात्र भारतच जिंकायचा. भारताला भारतात येऊन व्हाइट वॉश देणे ही तर अशक्यप्राय गोष्ट होती पण आता मात्र परदेशी संघासाठी ते सहज शक्य झाली आहे. असे काय कारण आहे की भारतीय संघ आपल्याच भूमीवर जिंकू शकत नाही असा प्रश्न क्रिकेट वर्तुळात विचारला जात आहे याचे सरळ आणि साधे उत्तर आहे ते म्हणजे चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती.... या कसोटी मालिकेसाठी जो भारतीय संघ निवडला होता तोच मुळी कसोटी क्रिकेटच्या योग्यतेचा नव्हता. या कसोटी मालिकेसाठी जो संघ निवडला त्यातील किती खेळाडू हे कसोटी खेळण्याच्या लायक होते ? हा संशोधनाचा विषय आहे. या संघात जे फलंदाज निवडले त्यांच्याकडे कसोटी क्रिकेटसाठी लागणारे तंत्र आहे का तर याचे उत्तर नाही असेच देता येईल. कसोटी मालिकेसाठी निवडलेला संघ कसोटी दर्जाचा नव्हता. या संघात निवड झालेले खेळाडू हे आयपीएल गाजवलेले धुरंदर होते. टी २० आणि कसोटी क्रिकेट यात जमीन अस्मानचा फरक आहे. कसोटीसाठी लागणारे तंत्र आणि संयम या खेळाडूंकडे नाही. फिरकी गोलंदाजी खेळण्यासाठी जे तंत्र लागते ते एकाही फलंदाजाकडे दिसले नाही. निवड समितीने जी चूक केली तीच किंबहुना त्याहून मोठी चूक संघ व्यवस्थापनाने केली. या मालिकेत संघ व्यवस्थापनाची रणनीती पूर्णपणे फसलेली दिसली. संघ व्यवस्थापनाने रचलेली एकही चाल यशस्वी ठरली नाही. भारतीय संघ व्यवस्थापन संघाची घडी बसवताना गोंधळलेला दिसला. पहिल्या कसोटीत चक्क चार फिरकी गोलंदाज खेळवण्यात आले. चार फिरकी गोलंदाज खेळवण्याची संघ व्यवस्थापनाची रणनीती पूर्णपणे फसली. चार फिरकी गोलंदाज खेळवल्यामुळे एक फलंदाज कमी पडला. त्यात शुभमन गिल जायबंदी झाल्यावर आपल्याकडे फलंदाजच उरला नाही कारण यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत हे कसोटीतही टी २० चा खेळ खेळतात. ध्रुव जुरेल हा नवखा फलंदाज असल्याने त्याच्याकडून जास्त अपेक्षा नव्हत्या. उरला एकटा के एल राहुल पण तो ही फॉर्मात नाही मग धावा करणार कोण ? जी गत पहिल्या कसोटीत झाली तीच गत दुसऱ्या कसोटीतही झाली. दुसऱ्या कसोटीत एक फिरकी गोलंदाज कमी करून नितीश कुमार रेड्डी याला खेळवण्यात आले पण त्याने दुसऱ्या कसोटीत ना गोलंदाजीत विकेट घेतल्या ना फलंदाजीत धावा काढल्या. विशेष म्हणजे दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या डावात त्याला फक्त एकच षटक गोलंदाजी दिली. त्याला जर गोलंदाजीच द्यायची नव्हती तर मग त्याला खेळवलेलेच का ? त्याच्या ऐवजी एक स्पेशालिस्ट फलंदाज खेळवला असता तर किमान भारताच्या काही धावा वाढल्या तरी असत्या. पहिल्या कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर खेळलेल्या वॉशिंग्टन सुंदर दुसऱ्या कसोटीत थेट आठव्या क्रमांकावर आला. दुसऱ्या कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर आलेला साई सुदर्शन फक्त हजेरी लावून गेला. ध्रुव जुरेलनेही तेच केले. या दोघांनी इंग्लंड दौऱ्यावर देखील काहीच केले नव्हते तरीही त्यांची निवड करण्यात आली. जर योग्य खेळाडूंची निवड झाली असती आणि रणनीती फसली नसती तर असा लाजिरवाणा पराभव झाला नसता. म्हणजेच चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती यामुळेच हा लाजिरवाणा पराभव भारतीय संघाला स्वीकारावा लागला. या पराभवातून धडा घेऊन बीसीसीआयने निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाला बरखास्त करायला हवे. बीसीसीआयने नवीन निवड समिती आणि नवा प्रशिक्षक लवकरात लवकर निवडायला हवा. प्रशिक्षकपदी गंभीर आल्यापासून भारतीय संघाची पिछेहाटच होत आहे विशेष म्हणजे सतत पराभव होऊनही गंभीर आपली रणनीती बदलायला तयार नाही तर निवड समिती अध्यक्ष अजित आगरकर हे चुकीची संघ करत आहे. या दोघांचीही गच्छंती करण्याची वेळ आली आहे जर या दोघांना आणखी अभय दिले तर या पराभवाची पुनरावृत्तीच पहायला मिळू शकते.

## माहितीचा अधिकार कायदा २००५ विषयी मुक्त विद्यापीठात दोन दिवशीय प्रशिक्षण कार्यशाळा



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात 'माहितीचा अधिकार कायदा २००५' याविषयीची दोन दिवशीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. विद्यापीठाच्या कृषि विज्ञान केंद्र सभागृहात विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

व्यासपीठावर यशदाचे सत्र संचालक तथा संशोधन अधिकारी श्री. दादू बुळे, यशदाच्या मुख्य प्रशिक्षक श्रीमती रेखा साळुंखे, विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, विद्यापीठ ग्रामीण विकास आणि उद्योजकता विद्याशाखेचे संचालक प्रा. कैलास मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलतांना मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की पाक - बांगलादेश या आपल्या शेजारी राष्ट्रांसह जगातील बहुतेक देशांमध्ये अराजकता व अस्वस्थता आहे. त्यातुलनेत प्रगतीशील भारतात संविधानानुसार राज्यकारभार सुरु आहे. माहितीचा अधिकार कायदा - २००५ हा त्याचाच परिपाक आहे. असा हा माहितीचा अधिकार वापरतांना या कायद्याचे प्रयोजन, उद्देश, तर्क, परिणाम व फलनिष्पत्ती समजून घेतली पाहिजे. सकारात्मक दृष्टीकोनातून, चांगल्या कामासाठी त्याचा वापर करावा असे आवाहन त्यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी केले. यशदाचे सत्र संचालक तथा संशोधन अधिकारी श्री. दादू बुळे यांनी माहिती अधिकारातून आपल्याविरुद्ध कोणी अपिलात जाणार नाही एवढी कामकाजात पारदर्शकता ठेवावी असे आवाहन केले. यशदाच्या मुख्य प्रशिक्षक श्रीमती रेखा साळुंखे यांनी आपल्या मार्गदर्शनात आपण माहितीचे मालक नाही तर संरक्षक व जनतेचे सेवक आहोत अशी भावना मनात ठेवून काम करावे असे आवाहन केले.

या कार्यशाळेत माहितीचा अधिकार कायदा - २००५, त्यातील विविध कलमे, तरतुदी, वैशिष्ट्ये, अर्जाचे प्रकार व ते निकाली कसे काढावेत, परिपत्रके, मार्गदर्शक सूचना याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी विद्यापीठातील विविध विद्याशाखा संचालक, कार्यरत जन माहिती अधिकारी, सहाय्यक जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी, प्राध्यापक, आणि इतर अधिकारी - कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. प्रास्ताविक विद्यापीठ ग्रामीण विकास आणि उद्योजकता विद्याशाखेचे संचालक प्रा. कैलास मोरे यांनी तर सूत्रसंचालन श्री. किशोर शिंदे यांनी केले.

## चांगले स्वास्थ्य हीच खरी ताकद - अभिनेता अक्षय कुमार

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** 'लहान मुले हल्ली मोबाइल गेममध्ये रमली असून मैदानात येणाऱ्या मुलांची संख्या सध्या कमी झालेली पाहायला मिळत आहे. अशा परिस्थितीत पुण्यातून ४४ हजार खेळाडू मैदानात उतरतात, ही खूपच मोठी गोष्ट आहे. खेळातूच उत्तम आरोग्य घडत असते आणि आरोग्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे आणि चांगले स्वास्थ हीच खरी ताकद असल्याचं मत अभिनेता अक्षय कुमारनं व्यक्त केलं.

अक्षय कुमारनं साधला खेळाडूंशी संवाद : पुण्याचे खासदार आणि केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारानं आयोजित खासदार क्रीडा महोत्सवाचा गणेश कला क्रीडा रंगमंच येथे समारोप झाला. यावेळी खेळाडूंना मार्गदर्शन करताना अक्षय कुमार म्हणाले. या कार्यक्रमात जवळपास चार हजार खेळाडूंना गौरवण्यात आलं. अक्षय कुमार यांनी लहान खेळाडूंशी संवादही साधला. अक्षय कुमार आणि खासदार मुरलीधर मोहोळ सायकल चालवत व्यासपीठाजवळ आले. यावेळी उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, खेलरत्न पुरस्कार प्राप्त आंतरराष्ट्रीय नेमबाज अंजली भागवत, मुख्य समन्वयक मनोज एरंडे, ऑलिम्पियन रेखा भिडे, माजी कबड्डीपटू शांताराम जाधव, ऑलिम्पियन बॉक्सर मनोज पिंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

अक्षय कुमारचा खेळाडूंना सल्ला : यावेळी अक्षय कुमार म्हणाला की, ''सर्वात आधी इतके सारे स्पोर्ट्समन पाहून खूप छान वाटलं. मी त्यांच्या आई-वडिलांचा खूप आभारी आहे. त्यांनी मुलांना खेळासाठी पाठिंबा दिला. माझे वडील मला नेहमी म्हणायचे. सकाळी लवकर उठ, रात्री लवकर झोप. तो मंत्र मी आजही पाळला आहे. जे उशीरपर्यंत जागे राहतात, ते उंदीर असतात. लवकर झोपणे आणि उत्तम आरोग्य जपणे हे सर्वात जास्त गरजेचं आहे. आता जेवढे खेळाडू सहभागी झाले त्यापेक्षा पुढच्या वर्षी एक लाख खेळाडूंचा यात सहभाग असायला पाहिजे'', असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. दरम्यान अक्षयच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं तर तो पुढं 'भूत बंगला', 'वेलकम टू द जंगल', 'भागम भाग २',' राम और श्याम', 'हेरा फेरी ३', हैवान आणि 'राउडी राठौर २' या चित्रपटांमध्ये दिसणार आहे.

पान १ वरुन...

## नाशिकचा पालकमंत्री का नेमला

सरकारचे आहे. दुर्दैवाने गेल्या वर्षी प्रयागराजमध्ये जे काही घडले, चेंगराचेंगरीमध्ये किती भाविक भाविकांचा जीव गेला? त्याचा नेमका आकडा अजून आलेला नाही. भाविकांना सोयी सुविधा देण्याचे काम सरकारचे असल्याने त्यात पारदर्शकपणा असला पाहिजे. आज देखील नाशिकचा पालकमंत्री नेमला का जात नाही हे एक कोड आहे. त्या कोड्याचे उत्तर कुंभमेळ्याच्या एकूण होणाऱ्या खर्चात आहे का? असा सवाल उपस्थित करत त्यांनी सरकारवर निशाणा साधला.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, कुंभमेळ्याच्या निमित्ताने साधू ग्राम होणार आहे. ते नेमके मागच्या वेळेस कुठे झाले होते, याची माहिती आपण मिळवू शकतो. पण, यावेळी तपोवन नष्ट करण्यात येणार आहे. तपोवन म्हणजे प्रभू श्रीरामचंद्र, सीता, लक्ष्मण हे काही काळ तेथे वास्तव्यास होते, अशी मान्यता आहे. प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ज्या काही मोजक्या जागा आपल्या देशात ओळखल्या जातात त्यापैकी तपोवन ही एक जागा आहे. तिथे जवळपास ६० वेगवेगळ्या प्रकारची झाडे आहेत. त्यातली अनेक औषधी वनस्पती आहेत. ही झाडे सगळीच शेकडो किंवा हजारो वर्षांची नाहीत, झाडे सुद्धा रिजनरेट होत असतात. अनेक वर्षांपासून तिथे निसर्गाचे चक्र सुरू आहे. या तपोवनाने आपल्यापेक्षाही जास्त कुंभमेळे अनुभवलेले असतील.

## निवडणूक सुधारणा यादीचा

विरोधकांकडून संपूर्ण प्रक्रियेवर प्रश्र्नचिन्ह निर्माण केलं जात असताना अजूनही कोणताही निर्णय आयोग किंवा सर्वोच्च न्यायालयाकडून घेण्यात आलेला नाही. काँग्रेसने एसआयआर प्रक्रियेदरम्यान कामाच्या ताणामुळे मृत्युमुखी पडलेल्या बीएलओच्या मृत्यूला हत्या म्हटले आहे. काँग्रेस प्रवक्त्या सुप्रिया श्रीनाते म्हणाल्या की, २० दिवसांत २६ बीएलओचे मृत्यु हे दिवसाढवळ्या हत्यासारखे आहे. गोंडाचे बीएलओ विपिन यादव यांचा उल्लेख करताना सुप्रिया म्हणाल्या की, त्यांच्या कुटुंबाने असे सांगितले की, मतदार यादीतून मागासवर्गीय नावे काढून टाकण्यासाठी त्यांच्यावर दबाव होता. सुप्रिया म्हणाल्या की, ही कथा नाही तर देशासमोरील एक कठोर सत्य आहे. घाई काय आहे? थोडा वेळ घ्या आणि एसआयआर करा. एसआयआरचा मुद्दा छोटासा नाही. ही मत चोरीची सर्वात शक्तिशाली पद्धत आहे आणि म्हणूनच ती इतक्या उघडपणे वापरली जात आहे.

दरम्यान, बुधवारी, सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडू, पश्र्चिम बंगाल आणि केरळ यांनी एसआयआरविरुद्ध दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी केली. सुनावणीदरम्यान, निवडणूक आयोगाने म्हटले की राजकीय पक्ष एसआयआर प्रक्रियेबाबत जाणूनबुजून भीतीचे वातावरण निर्माण करत आहेत. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने केंद्र आणि राज्य निवडणूक आयोगांना केरळ सरकारच्या याचिकेवर १ डिसेंबरपर्यंत उत्तर देण्याचे निर्देश दिले. पुढील सुनावणी २ डिसेंबर रोजी होईल. तामिळनाडूची याचिका ४ डिसेंबर रोजी आणि पश्र्चिम बंगालची याचिका ९ डिसेंबर रोजी सुनावणी होईल. निवडणूक आयोग त्याच दिवशी राज्याची प्रारूप मतदार यादी देखील प्रसिद्ध करेल. खंडपीठाने म्हटले की, जर राज्य सरकारांनी ठोस कारणे दिली तर आम्ही तारीख वाढवण्याचे निर्देश देऊ शकतो. त्यांनी सांगितले की एसआयआर यापूर्वी कधीही केले गेले नाही आणि केवळ हेच कारण निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देण्यासाठी आधार असू शकत नाही. निवडणूक आयोग १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार याद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाचा दुसरा टप्पा राबवत आहे. त्यांची अंतिम मतदार यादी ७ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रकाशित केली जाईल. सप्टेंबरमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी बिहारमध्ये एसआयआरचा पहिला टप्पा पूर्ण झाला. या प्रक्रियेत अंदमान आणि निकोबार बेटे, छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, लक्षद्वीप, मध्य प्रदेश, पुद्दुचेरी, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्र्चिम बंगाल यांचा समावेश आहे.

## युनेस्को मुख्यालयात संविधानाचे

असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

युनेस्कोच्या मुख्यालयात युनेस्कोचे महासंचालक खालिद अल-इनाय यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले. याप्रसंगी भारताचे युनेस्कोतील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाने यापूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील घर खरेदी आणि त्याचे संग्रहालयात रूपांतरण केले आहे. जपानमधील कोयासान विद्यापीठातही डॉ. बाबासाहेबांचा पुतळा उभा राहिला आहे. आता मुंबईतील इंदूमिल येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या कामालाही वेग दिला आहे, याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी वेळोवेळी निर्देश दिले आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# भिजलेला माणूस कुणाला घाबरत नाही, धमकी काय देता, जे काय करायचे ते करून टाका; निलेश राणे मनातले सगळे बोलून गेले!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना शिंदे गटाचे आमदार निलेश राणे यांनी २६ नोव्हेंबर रोजी मालवणमधील भाजपाचे पदाधिकारी विजय किनवडेकर यांच्या राहत्या घरी धाड टाकली. यावेळी निलेश राणेंना विजय किनवडेकर यांच्या घरी अवैध आणि हिशोबी नसलेली मोठी रोख रक्कम आढळून आली. विजय किनवडेकर यांच्या घरी बेहिशोबी २५ लाख रुपये मिळाले. एका खोलीत हिरव्या रंगाच्या पिशवीत हे पैसे असल्याचे दिसून आले. रवींद्र चव्हाण मालवणमध्ये येऊन गेले, वेगाने पैसे वाटपाची पद्धत सुरू झाली आहे, असे म्हणत निलेश राणे यांनी रवींद्र चव्हाण यांच्यावर गंभीर आरोप केले होते. या प्रकरणावरून कोकणात भाजप विरुद्ध शिवसेना शिंदे गटात जुगलबंदी सुरु असल्याचे दिसून येते. आता यावर निलेश राणे यांनी सविस्तर भाष्य केले आहे.



निलेश राणे म्हणाले की, निवडणूक आयोगाने, पोलिसांनी पैसे जप्त केले म्हणजे क्राईम झालेला आहे. एवढा वेळ जाऊन देखील एफआरआय सोडा, नोटीस देखील आरोपीला गेलेली नाही. हे पैसे कुठून आलेत? यासंबंधीत तपशील देखील घेण्यात आलेला नाही. हे सर्व अपेक्षित होतं. यात नवीन काहीच नाही. भाजप मालवण नगरपरिषदेच्या उमेदवार शिल्पा खोत यांच्या विरोधात कोर्टात गेलो, त्यांची काल पहिली तारीख होती. मात्र, त्यांनी साधा वकील सुद्धा दिलेला नाही. तुम्ही म्हणत होता की, न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे, तुम्ही गेला नाहीत. तुमचे वकीलही गेले नाहीत. हा कुठला न्याय व्यवस्थेवर विश्वास? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

विजय केनवडेकर यांच्या घरात परवानगी मागून गेलो होतो, दरवाजा त्यांनी उघडला तेव्हा त्यांनी थांबवलं पाहिजे होतं. त्यांनी आत येऊन बसायला सांगितलं, मग अनधिकृत त्यांच्या घरी कसा गेलो? त्यांना उलटे आरोप करायला लाज वाटली पाहिजे. मी क्राइम शोधून दिले, त्यावर म इझ्यावर कारवाई करणार काय? त्यांनी क्राईम करून माफी मागायची सोडून आत कसा शिरला म्हणतात, विषय बदलायचे काम सुरु आहे. आम्हाला गृहीत धरू नये, शासकीय कामाला वेळ लागतो, तो वेळ दिलेला आहे. पण गुन्हा दाखल झाला पाहिजे. गुन्हा घडला म्हणजे कारवाई झाली पाहिजे, तसेच इतर दोन लोक होते त्यांच्यावर देखील गुन्हा दाखल केला पाहिजे, अशी मागणी निलेश राणे यांनी केली आहे.

हमाम मै सब नंगे होते है, असा टोमणा नितेश राणेंनी नितेश राणेंना लगावला होता. यावर बोलताना हे उर्दू आहे, असं त्यांनी म्हटलं. मी माझ्या पक्षाचे काम करतो आणि करत राहणार. कुठे चुकीचं दिसलं तर आवाज उठवणार. मी पुराव्याच्या आधारावर बोलतो. माझा आरोप थेट रवींद्र चव्हाण यांच्यावर आहे. ते आणि त्यांची लोक यातून वाचू शकत नाहीत. आमचा न्याय व्यवस्थेवर विश्वास आहे, असे त्यांनी सांगितले.

रवींद्र चव्हाण येतात तेव्हा पैशांचे वाटप होते असं वक्तव्य निलेश राणेंनी केला होता. यावर उदय सामंत देखील जिल्ह्यात येऊन गेले, त्यांना आम्ही सांताक्लॉज म्हणायचे का? असा प्रश्न नितेश राणेंनी उपस्थित केला होता. यावर बोलताना निलेश राणे म्हणाले की, आरोप प्रत्यारोप होत राहणार. उदय सामंत येऊन गेले तेव्हा तुम्हाला वाटलं असेल असं काही होत होतं तर तक्रार केली पाहिजे होती. मी तुमच्या विरोधात तक्रार केली.

तुमचे कार्यकर्ते पैसे वाटण्यात व्यस्त होते. हातात दहा, दहा पंधरा हजार रुपये घेऊन भाजपचे सर्व कार्यकर्ते म तदारांना पैसे देण्यात ते व्यस्त होते. ते क्राइम कुठे शोधणार? रवींद्र चव्हाण यांच्या जवळच्या कार्यकर्त्यांची गाडी, घर, सोन घ्यायची बुकिंग करून ठेवली. परदेशात फिरायला जायला बँक बॅलन्स जमवत आहेत. रवींद्र चव्हाण जे पैसे देत आहेत ते पैसे ६० टक्के सुद्धा खाली गेलेले नाहीत. जवळच्या कार्यकर्त्यांच्या घरात जात आहेत. त्यामुळे त्यातील १० ते १५ जण खायला बसलेत, असा आरोप त्यांनी केलाय.

मी पैसे वाटते असेल तर पुरावा द्या, तुमच्याकडे सत्ता आहे, तुम्ही फोन टॅब करू शकता. आमच्या जिल्ह्यात मालवण निवडणूक लागली, बाकी सगळ्या निवडणुका संपल्यात. भिजलेला माणूस कुणाला घाबरत नाही, धमकी का देता? जे काय करायचं ते करून टाका. दोन तारखेपर्यत युती टिकवायची आहे, असे रवींद्र चव्हाण म्हणतात. यावरून तुमच्या मनात काय आहे हे दिसतं. ही मित्रपक्षांना धमकी आहे, असं मला वाटतं. मालवणमध्ये एका बाजूला गरिबीत आणि दुसऱ्या बाजूला श्रीमंतीत निवडणूक होतेय, हे बघून त्रास होतोय. हे महाराष्ट्रभर पसरू नये. हे त्या-त्या ठिकाणी थांबलं तर महाराष्ट्राचे चित्र बदलेल, असे देखील निलेश राणे म्हणाले.

## आशिया चषकासाठी टीम इंडियाची घोषणा! मराठमोळ्या खेळाडूकडे नेतृत्वाची धुरा; वैभव सूर्यवंशीलाही संधी




नवी दिल्ली : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आशिया चषक अंडर -१९ स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. या स्पर्धेला येत्या १२ डिसेंबरपासून सुरूवात होणार आहे. या स्पर्धेचे आयोजन दुबईत केले जाणार आहे. दरम्यान या स्पर्धेसाठी जाहीर करण्यात आलेल्या १५ सदस्यीय संघाचे कर्णधारपद मुंबईकर आयुष म्हात्रेकडे सोपवण्यात आले आहे. तर विहान मल्होत्राची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे.

भारताचा १४ वर्षीय स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशीला देखील या संघात स्थान देण्यात आलं आहे. काही दिवसांपूर्वी वैभव भारतीय अ संघाचं प्रतिनिधित्व करताना, आशिया चषक रायझिंग स्टार्स ही स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरला होता. या स्पर्धेत फलंदाजी करताना त्याने यूएईविरूद्धच्या सामन्यात वादळी शतकी खेळी केली होती. आता तो १९ वर्षांखालील संघाकडून खेळताना आशिया चषक स्पर्धेत धावांचा पाऊस पाडताना दिसून येणार आहे. सध्या तो सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत बिहार संघाचं प्रतिनिधित्व करत आहे.

या स्पर्धेसाठी जाहीर करण्यात आलेल्या संघात किशन सिंगचा देखील समावेश करण्यात आला आहे. पण तो अजूनही पूर्णपणे फिट झालेला नाही. त्यामुळे त्याला खेळायची संधी मिळणार की नाही, हे स्पष्ट झालेलं नाही. बीसीसीआयने १५ सदस्यीय संघासह ४ राखीव खेळाडूंची देखील नावं जाहीर केली आहे. ज्यात राहुल कुमार, हेमचुदेशन जे, बीके किशोर आणि आदित्य रावत यांचा समावेश आहे.

आशिया चषक २०२५ अंडर-१९ स्पर्धेसाठी असा आहे भारतीय अंडर-१९ संघ:

आयुष म्हात्रे (कर्णधार), वैभव सूर्यवंशी, विहान मल्होत्रा (उपकर्णधार), वेदांत त्रिवेदी, अभिग्यान कुंदु (यष्टीरक्षक), हर्वेश सिंग (यष्टीरक्षक), युवराज गोहिल, कनिष्क चौहान, खिलन पटेल, नमन पुष्पक, डी दिपेश, हेनिल पटेल, उद्धव मोहन, आरोन जॉर्ज, किशन कुमार सिंग ( फिट असेल तर)

राखीव खेळाडू:

राहुल कुमार, हेमचुदेशन जे, बीके किशोर, आदित्य रावत

## कल्याण- कर्जत प्रवास सुखाचा होणार, बदलापूर- कर्जत तिसऱ्या- चौथ्या मार्गिकेला केंद्राची मंजूरी

**मुंबई/प्रतिनिधी :** कल्याण ते बदलापूर दरम्यान सुरू असलेल्या तिसरी- चौथी मार्गिका प्रकल्पाला आणखी बळ मिळाले आहे. केंद्र सरकारने नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत बदलापूर- कर्जत या महत्त्वाच्या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणास मंजुरी देऊन मध्य रेल्वेच्या विस्तार योजनांना गती दिली आहे. या मंजुरीनंतर कल्याण ते कर्जतदरम्यान अखंड तिसरी- चौथी मार्गिका उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला असून त्याचा थेट फायदा लाखो उपनगरीय प्रवाशांना होणार आहे.एकूण ३२ किलोमीटर लांबीच्या या टप्प्यात सुमारे ६५ किलोमीटर रेल्वेमार्गांची उभारणी करण्यात येणार आहे. मार्गिकेमध्ये ६ स्थानके, ८ मोठे उड्डाणपूल, १०६ लहान पूल आणि १ भुयारी मार्ग उभारला जाणार आहे.

## डेटींग ॲपवर ओळख, हॉटेलवर रंगीन रात्र अनब सकाळी.., ठाण्यातील तरुणासोबत घडला नको तो प्रकार

**मीरा-भाईदर/प्रतिनिधी :** ठाण्याच्या मीरा भाईदर परिसरात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इथं एका तरुणाला डेटिंग ॲपवर ओळख झालेल्या तरुणीला घेऊन हॉटेलवर राहाणं चांगलंच महागात पडलं आहे. संबंधित तरुणीने तब्बल १ लाख ८३ हजारांना लुटलं आहे. या प्रकरणी मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी दोन तरुणींना अटक केली आहे. संबंधित तरुणींनी अशाच प्रकारे अनेक तरुणांना फसवल्याचा संशय आहे. पोलीस त्याअनुषंगाने तपास करत आहेत.

अरुनिमा उर्फ रूथ लुकास नायडू (वय २८) आणि बिमलादेवी श्रवणकुमार सिंग (वय ३०) असं अटक केलेल्या



आरोपी तरुणींची नावं आहेत. या प्रकरणी रणजीत नावाच्या ३१वर्षीय तरुणाने फिर्याद दाखल केली होती. या तरुणींनी 'हॅपन डेटिंग ॲप'चा वापर करून रणजितला हॉटेलमध्ये पार्टीच्या बहाण्याने बोलावलं होतं. यानंतर आरोपी तरुणींनी त्याचा १ लाख ८३ हजार रुपयांचा ऐवज लुटला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रणजितची 'हॅपन डेटिंग ॲप'वर अरुनिमा नावाच्या तरुणीशी ओळख झाली होती. ओळखीचं रूपांतर मैत्रीत झाल्यानंतर, या दोघींनी रणजितला हॉटेलमध्ये पार्टी करण्यासाठी बोलावले. दारूच्या नशेत रणजित धुंद झाल्याची संधी साधून या दोघींनी त्याचे सुमारे १ लाख ८३ हजार रुपयांचे मौल्यवान सामान घेऊन पोबारा केला.

काशिमीरा येथील आणखी एक गुन्हा उघडकीस

या दोघींच्या अटकेमुळे काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील असाच आणखी एक गुन्हा उघडकीस आला आहे. कांदिवली येथे राहणाऱ्या शार्दुल नावाच्या तरुणाची याच 'हॅपन डेटिंग ॲप'वर अरुनिमा (२७) नाव सांगणाऱ्या तरुणीशी ओळख झाली होती. या ओळखीनंतर दोघे काशिमीरा परिसरातील पंचरत्न लॉजमध्ये मुक्कामासाठी आले.

पोलिसांनुसार, खोली बुक केल्यानंतर शार्दुल दारूच्या नशेत झोपी गेला. सकाळी उठून पाहिले असता त्याच्या गळ्यातील सोन्याची चेन, मोबाइल, पॉवर बँक आणि इअरफोन जागेवर नव्हते. तसेच ती तरुणीदेखील तिथून निघून गेली होती. या प्रकरणी शार्दुलने काशिमीरा पोलिसात बुधवारी तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी पोलिसांनी सुमारे १ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरी केल्याबद्दल अनोळखी तरुणीवर गुन्हा दाखल केला होता. मांडवी पोलिसांनी अटक केलेल्या याच दोघींनी काशिमीरा येथेही शार्दुलला लुटल्याचे आता उघड झाले आहे.


# शासकीय व खाजगी आस्थापनांनी शी-बॉक्स प्रणालीवर नोंदणी करावी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सर्व खाजगी व शासकीय आस्थांपनानी तक्रार निवारण समिती स्थापन करणे बंधनकारक असून त्यांची नोंदणी शी-बॉक्स प्रणालीवर करावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा अधिकारी (कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध) यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिक छळ (प्रतिबंध, संरक्षण व निवारण) अधिनियम २०१३ नुसार प्रत्येक खाजगी व शासकीय आस्थापनांमध्ये १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी असतील अशा सर्व आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. यासाठी खाजगी व शासकीय आस्थापनांनी कार्यालयात गठीत केलेली तक्रार निवारण समितीची नोंदणी शी-बॉक्स प्रणालीवर (SHE BOX PORTAL) करण्याचे केंद्र शासनाने निर्देश आहे. यासाठी केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाने शी-बॉक्स ऑनलाईन तक्रार व्यवस्थापन प्रणाली विकसित केली आहे.


अशी करा नोंदणी : खाजगी आस्थापनांनी शी-बॉक्स अंतर्गत तक्रार समितीची माहिती नोंदविण्यासाठी https://shebox.wcd.gov.in या संकेतस्थळावर जाऊन होम पेजवर अंतर्गत तक्रार समिती Private Head Office Registration या टॅबवर क्लिक करुन माहिती या टॅबवर दिलेल्या सूचना वाचून संपूर्ण माहिती भरुन सबमीट करावी. तसेच सर्व शासकिय आस्थापनांनी आपल्या वरीष्ठ कार्यालयाशी किंवा जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय, मुट्ठे ले आऊट बुलढाणा येथे संपर्क साधुन शी-बॉक्स



प्रणालीचे युझरनेम व पासवर्ड प्राप्त करून आपल्या कार्यालयाची नोंद शी बॉक्स प्रणालीवर करावी.

प्रत्येक पात्र आस्थापनाने स्थापन केलेल्या अंतर्गत तक्रार निवारण समितीची माहिती कार्यालयाच्या दर्शनी भागात फलकाच्या स्वरूपात लावणे बंधनकारक आहे. जर कोणत्याही कार्यालयात समितीची माहिती दर्शविणारा फलक दिसला नाही किंवा तक्रार नोंदविण्यास अडचण येत असेल, तर पिडीत महिलांनी टोल फ्री क्रमांक १८१ वर संपर्क साधून तक्रार नोंदवू शकते. तरी जिल्ह्यातील सर्व खाजगी व शासकीय आस्थापनांनी तक्रार समिती स्थापन करुन शी-बॉक्स प्रणालीवर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

## शब्दकोडे क्र. 22



आडवे शब्द

१. '....... नको धुंद वारे, नको चांदण्या या' सुधीर फडके यांचे एक भावगीत ९. संगीतसभा, मैफल १०. कवितेतेली 'तुझे' १२. 'आ'काराची उभी रेघ १३. पुरणे, गाडणे १४. अगम्य, कळण्यास कठीण १६. पाणी १८. नातेवाईक १९. वरचढ, अधिक चांगल्या प्रतीचे २१. योग्य २२. पंढरपूरचे दैवत २४. प्रेत २६. बासरी २७. शिक्षा २९. कशा प्रकारचा? ३०. भयानक ३१. समुद्र ३४. सरोवर ३६. सोटा, 'घी देखा' लेकीन --- नही देखा ३७. अत्यंत तलम कापड ३९. खवा परतून केलेला गोड पदार्थ ४१. फरक, तफावत ४२. बालंट, आळ ४३. वाकबगार ४६. चित्रपट ४२. अर्धी ओंजळ ५१. अंतराळ ५२. पंख, दुसऱ्याचे ५४. चटकन, भरभर ५७. विपुलता ५९. जुगार ६०. अंतःकरण ६१. जेव्हा ६३. कर्जाचा बोजा, वजन ६४. लबाडी, कारस्थान ६५. चेहरा, मुख ६९. खेप, यात्रा ७०. जंगलात लागलेली आग ७१. राक्षस ७२. सरस्वतीचे एक नाव ७४. नमस्कार ७५. पर्ण, विडा ७६. घराणे ७८. कलावंत ७९. उपयोग ८०. पोरका ८१. सरसहा, भीडभाड न ठेवता

उभे शब्द

२. वेदना, त्रास ३. आलेला-गेलेला माल ४. प्रतिष्ठित ५. 'तुम्हावर केली मी मर्जी बहाल, -- सोडून जाऊ रंगमहाल (पिंजरा) ६. सेनापती ७. टिंगल, चेष्टा ८. हिंदीत लक्षात राहण्याजोगे ९. जाहीर सभा (हिंदी) १०. प्रामाणिक, सोज्वळ १४. पुष्कळ वेळा १५. शक्यतेप्रमाणे १७. रविवासर १८. कमीज बोरबरचे वस्त्र २०. श्रीमंत (हिंदी) २३. पाषण २५. पृथ्वीचा तळ २६. स्वयंपाकाचे शास्त्र २८. जादू करणारा ३२. खोडण्याचे साधन ३३. आजच्या आधीचा दिवस ३५. सुखी माणसाचा वस्त्रविशेष! ३७. मखर ३८. सहाय्य ३९. गुरांचा घोळका ४०. श्रीकृष्णाचा मामा ४१. साचलेली घाण, घाणीचा थर ४४. परमेश्वर ४५. ओळख ४७. अटीची भाषा ४८. राखण करणारा ५०. झाडाची त्वचा ५१. काजळ, सुरमा इ.प्रकार ५३. जहाजाचे लुटारू ५५. वस्त्र, कापड ५६. ओटा ५७अ. लाख ५८. मीठ ६२. घरोघर ६३. नशीबवान ६६. रोग्याला तपासून औषध देण्याची जागा ६७. आंबट गोड काटेरी फळ ६८. कशासाठी ६९. चणचण ७०. अरण्य ७१. मोठा भाऊ ७३. वर्तमानपत्रातील कप्पा ७५. झाडाभोवतीचा चबुतरा ७७. नाकावरील मोत्याचा दागिना ७८. सत्व

### शब्दकोडे क्र. 21 चे उत्तर

आडवे उत्तर

१.हकनाक ५.पदोपदी ८.मनमुराद ११.डरकाळी १२.सान १३.वास १५.दारोदार १७.दशानन १९.पखाल २०.सुसर २१.तनया २३.बारका २५.नाग २६.पापा २७.खाज २९.काळ ३०.पट ३२.परीक्षक ३५.पगार ३८.कडकडाट ४१.मादक ४३.नाराज ४४.कर ४५.रुपाया ४७.साकव ४९.शव ५०.कापरा ५१.कचरा ५४.तडतड ५६.सल ५८.नागरिक ६०.शनि ६२.बार ६३.पर्व ६५.जरतर ६७.वेळापत्रक ६९.अळमटळम ७०.जवळ ७२.खारट ७४.पनीर ७५.कसदार ७७.सण ७८.कमळ ८०.दादला ८१.टीका ८२.दार ८३.खडावा ८४.मानपान ८६.काल ८८.रणगाडा ८९.लीनता ९०.परतविणे

उभे उत्तर

१.हडळ २.कर ३.नाका ४.कळीदार ५.पडदा ६.पसा ७.दीनदयाळ ८.मदनबाण ९.मुका १०.दवाखाना १४.सलग १६.रत १८.नर २०.सुपारी २२.नकार २४.कापडचोपड २६.पापभीरू २८.जप ३१.टक ३३.क्षमायाचना ३४.कद ३६.गाढव ३७.ऐरावत ३९.डाक ४०.टरफल ४२.कसा ४३.नाश ४६.पाक ४८.कनक ५०.कातरवेळ ५२.राग ५३.बेशरम ५५.डबा ५६.सर्वत्र ५७.जीव ५९.रिकामटेकडा ६१.नित ६३.पपनस ६५.जळजळ ६६.रजनी ६८.कसर काढणे ६९.अट ७१.वरदान ७२.खासदार ७३.रणरण ७४.पवन ७५.कलाकार ७६.दाटी ७९.मवाली ८३.खडा ८४.माता ८५.पाड ८७.लता

## वृत्तविशेष...

### ७ डिसेंबरला सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास शुभारंभ

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निधी संकलनाचा शुभारंभ रविवार, दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ''सैनिकी मंगल कार्यालय'', जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलडाणा येथे होणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा ध्वजदिन निधी संकलन समिती, बुलडाणा यांच्या हस्ते होणार असून मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

ध्वजदिनाच्या निमित्ताने जिल्ह्यातील सर्व वीर पत्नी, वीर माता-पिता, माजी सैनिक विधवा, माजी सैनिक व त्यांचे अवलंबित, पत्रकार बांधव, तसेच उत्कृष्ट निधी संकलन करणाऱ्या कार्यालयांचे अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

सशस्त्र सेना ध्वजदिन हा राष्ट्ररक्षकांच्या सन्मानाचा दिवस असून, या दिवशी जमा होणारा निधी हुतात्मा आणि माजी सैनिकांच्या कल्याणासाठी वापरला जातो. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून ध्वजदिनाला सन्मान द्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

### सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी सुवर्णसंधी; बुलढाणा येथे पाच दिवसीय पशुपालन प्रशिक्षण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजागार युवक व युवतींसाठी बुलडाणा येथे शेळीपालन, कुक्कुटपालन, गाय, म्हैसपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दि. ९ ते १३ डिसेंबर २०२५ या पाच दिवसांच्या कालावधीत होणार आहे.

या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश हा सुशिक्षित बेरोजगार यांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करावा हा आहे. या प्रशिक्षणात शेळीपालन, कुक्कुट आणि गाय म्हैस पालनाचे तंत्र व प्रकार, त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन, रोग व लक्षणे, खाद्य निर्मिती व चाऱ्याचे प्रकार व उद्योग सुरु करण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाणार आहे. त्यासोबत उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन, शासकीय योजनाची माहितीचे मार्गदर्शन या प्रशिक्षणात तज्ज्ञ व्यक्ती करणार आहे.

प्रशिक्षणात प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार हा किमान ५ वी पास, वय १८ ते ५० वर्षे असावे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिल्या जाईल. प्रशिक्षणासाठी नोंदणी प्रक्रिया सुरु झाली असून त्यासाठी दि. ९ डिसेंबरपर्यंत कार्यालयीन वेळेत गणेश गुप्ता प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालय जवळ, चिखली रोड, बुलडाणा यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय त्यांना ८२७५०९३२०१/९०११५७८८५४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी किशोर अंभोरे यांनी केले आहे.

### नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक; कामगारांना मतदानासाठी भरपगारी सुट्टी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायातींच्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर झाला आहे. कार्यक्रमानुसार निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मंगळवार, दि. २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. नागरिकांना हक्क बजावता यावा यासाठी राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे.



जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांच्या निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात कामगारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी भरपगारी सुट्टी द्यावी, अशा सूचना सरकारी कामगार अधिकारी म. तु. जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिले आहे.

उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि. २८ नोव्हेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने, हॉटेल इत्यादी ठिकाणी काम करणारे कामगार व कर्मचारी मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्याकरीता भरपगारी सुट्टी देण्यात यावी. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल. तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन ते तीन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील. मतदानासाठी सुट्टी किंवा पूर्वपरवानगीने सवलत न दिल्यास आस्थापना धारकाविरूद्ध कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. तरी बुलडाणा जिल्ह्यातील सर्व कामगार मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, याकरीता सर्व प्रकारच्या आस्थापना धारकांनी भरपगारी सुट्टी द्यावी, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी म. तु. जाधव यांनी केले आहे.

# लोणारच्या सर्वांगीण विकासासाठी शिंदे गट शिवसेनेलाच सत्ता द्या : केंद्रीय मंत्री जाधव

## विकास जनतेच्या दारी नेण्यासाठी संधी द्या; भव्य जाहिर सभेला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद







दैनिक आपला विदर्भ

**लोणार/प्रतिनिधी** : लोणार शहराच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न प्रत्यक्षात आणायचे असेल तर आगामी नगरपरिषद निवडणुकीत शिंदे गट शिवसेनेच्या हाती सत्ता द्या, असे आवाहन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. लोणार येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य जाहीर सभेला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. शहरातील विविध भागांतून मोठ्या संख्येने युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक सभास्थळी उपस्थित राहिले.

मागील १० वर्षांतील ठप्प विकासावर टीका केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव म्हणाले, ''मागील १० वर्षांपासून लोणार नगरपरिषदेवर काँग्रेसची सत्ता असून, कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करूनही ना-हरकत प्रमाणपत्राच्या कारणावरून कामे मुद्दाम अडविण्यात आली. शहरातील विकास थांबवून काँग्रेसने जनतेला वेठीस धरले. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, पायाभूत सुविधा, पर्यटन विकास अशी महत्त्वाची कामे रखडली.''

ते पुढे म्हणाले, ''गेल्या अडीच वर्षांच्या प्रशासकीय काळात राज्य आणि केंद्र शासनाकडून मोठा निधी उपलब्ध करून दिला, ज्यामुळे महत्त्वाच्या योजना मार्गी लागल्या. आगामी काळात शिवसेनेची सत्ता नगरपरिषदेवर आल्यास लोणार शहराला जागतिक स्तरावर विकसित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणण्याची हमी मी देतो.''

**विकासाचा रोडमॅप जाहीर**

प्रतापराव जाधव यांनी सांगितले की, सत्ता मिळाल्यानंतर खालील महत्त्वाचे प्रकल्प तातडीने हाती घेण्यात येतील: लोणार सरोवर परिसराचा पर्यटन म्हणून सर्वांगीण विकास शहरातील रस्ते, सार्वजनिक सुविधा, पाणीपुरवठा व मलनिस्सारण व्यवस्था उभारणी महिला व युवकांसाठी विशेष योजना स्वच्छ, हरित, आधुनिक लोणार शहराची उभारणी केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजना जनतेपर्यंत जलद पोहोचवणे

**विरोधकांवर डॉ. संजय र ायमुलकर यांचा निशाणा**

माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर म्हणाले, ''अडीच वर्षांत नगरपरिषदेवर कोट्यवधींचा निधी दिल्याचा ठोस पुरावा आमच्याकडे आहे. शिवसेना आमदारखासदार असताना देखील लोणारसाठी भरपूर निधी आणला. पण काँग्रेसने ना-हरकत प्रमाणपत्राच्या नावाखाली कामे थांबवून शहराचा विकास रोखला. सत्ता त्यांची, आणि हिशोब आम्हाला हे लोकशाहीत कसे?'' असा प्रश्न उपस्थित करून त्यांनी विरोधकांना चांगलेच धारेवर धरले.

**सभेला महिलांचा व युवकांचा उत्स्फूर्त सहभाग**

सभेमध्ये महिलांचा मोठा सहभाग पाहायला मिळाला. अध्यक्षपदाच्या उमेदवार संगीताताई मापारी यांना जनतेचे विशेष समर्थन मिळत असल्याचे या सभेतून स्पष्ट झाले. अनेक युवकांनी डफाच्या गजरात, भगवे झेंडे हातात घेऊन सभा रोमांचक केली. व्यापारी, शिक्षक, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतापराव जाधव व डॉ. संजय रायमुलकर यांच्या नेतृत्वावर विश्वास दर्शवला. संपूर्ण सभेत ''शिवसेना विजयाच्या दिशेने वाटचाल करीत आहे'' असे वातावरण दिसून आले.

**प्रतापराव जाधव यांचे आवाहन**

''शहराच्या प्रगतीसाठी, स्वच्छ व पारदर्शी प्रशासनासाठी, लोणारला आधुनिक व जागतिक स्वरूप देण्यासाठी शिवसेनेच्या संगीताताई मापारी यांना अध्यक्ष म्हणून आणि सर्व उमेदवारांना नगरसेवक म्हणून विजयी करा.''

### महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश सरकारचा निर्णय, जन्मतारखेचा पुरावा म्हणून 'आधार कार्ड' ग्राह्य नाही

**मुंबई/प्रतिनिधी** : जन्मतारखेचा पुरावा म्हणून आधार कार्ड स्वीकारण्यावर महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश सरकारने बंदी घातली आहे. बनावट जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे तयार होण्याचे प्रकार रोखण्यासाठी आणि अनियमिततेवर नियंत्रण आणण्यासाठी दोन्ही राज्यांनी हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हा निर्णय घेण्यात आला असून, आधारचा वापर करून काढलेली सर्व विलंबित जन्म प्रमाणपत्रे रद्द करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत.उत्तर प्रदेशच्या नियोजन विभागाने स्पष्ट केले आहे की, आधार कार्डाशी कोणतेही जन्म प्रमाणपत्र जोडलेले नसल्याने ते जन्मदाखला म्हणून ग्राह्य धरणे चुकीचे ठरते. विशेष सचिव अमित सिंग बन्सल यांनी सर्व विभागांना या संदर्भातील सूचना पाठवल्या आहेत.महाराष्ट्र महसूल विभागानेही अशाच प्रकारचे आदेश जारी केले आहेत. जन्म आणि मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ लागू झाल्यानंतर आधाराच्या आधारे तयार केलेली प्रमाणपत्रे वैध मानली जाणार नाहीत, असे निर्देश देण्यात आले. तसेच कॅबिनेट मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी संशयास्पद प्रमाणपत्रे जारी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

### पुरुष नसबंदी पंधरवडा: बुलढाण्यात आरोग्य विभागाची जनजागृती मोहीम

**बुलढाणा/प्रतिनिधी** सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यात दरवर्षी राबविण्यात येणारा पुरुष नसबंदी पंधरवडा यंदा बुलढाणा जिल्ह्यात २१ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या कालावधीत विशेष उपक्रमांसह राबविण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर, एएनएम तसेच मेडिकल ऑफिसर्स यांच्या माध्यमातून घराघरांत जाऊन पुरुष नसबंदीबाबत जनजागृती केली जात आहे.

डॉ. गिते यांनी सांगितले की, कुटुंब नियोजनात पुरुषांचा सहभाग वाढणे ही काळाची गरज बनली आहे. पुरुष नसबंदी ही सोपी, सुरक्षित आणि प्रभावी प्रक्रिया असून याबाबतच्या गैरसमजांना दूर करण्यासाठी आरोग्य यंत्रणा सातत्याने काम करत आहे.

जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयात पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया नियोजित पद्धतीने करण्यात येत आहेत. गावांतील बैठका, दैनंदिन भेटी, मेळावे, युवक मंडळांच्या माध्यमातूनही माहिती देण्यावर भर दिला जात आहे.

पुरुष नसबंदीचे फायदे : प्रक्रिया अत्यंत सोपी व पूर्णपणे सुरक्षित, कामधंद्यावर कोणताही विपरीत परिणाम नाही, लैंगिक क्षमतेवर कोणताही परिणाम होत नाही, स्त्री नसबंदीपेक्षा अधिक सोपी, कमी धोका व जलद रिकव्हरी, लाभार्थ्यांना १ हजार ४५० रुपये आर्थिक प्रोत्साहन. पुरुष नसबंदी ही महिलांवरील कुटुंब नियोजनाचा भार कमी करणारी आणि संपूर्ण कुटुंबासाठी सुरक्षित पर्याय असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले आहे. तरुणांनी पुढाकार घेऊन या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी केले आहे.

# नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक मतदानासाठी १२ ओळखपत्रांना मान्यता

## कोणत्याही एका वैध ओळखपत्रावर मतदान करता येणार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या मंगळवारी दि. २ डिसेंबर रोजी मतदान व दि. ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. मतदानासाठी मतदार ओळखपत्र अनिवार्य असले, तरी यंदा मतदारांना मतदानाच्या दिवशी १२ प्रकारच्या पर्यायी ओळखपत्राद्वारे मतदान करता येणार आहे. त्यामुळे मतदार ओळखपत्र नसल्यास मतदारांनी मतदानासाठी जातांना १२ पैकी कोणतेही एक ओळखपत्र सोबत ठेवून मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

मतदानासाठी मतदार ओळखपत्र अनिवार्य असले, तरी अनेक मतदारांकडे मतदान कार्ड नसल्याचे आढळून येते. यामुळे मतदानाच्या दिवशी होणाऱ्या अडचणी टाळण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने १२ प्रकारची पर्यायी फोटोसहित ओळखपत्रे वैध ठरवली आहेत. यात भारताचा पासपोर्ट, वाहन चालविण्याचा परवाना, आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र, केंद्र शासन / राज्य शासन / सार्वजनिक उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहित दिलेली ओळखपत्रे, राष्ट्रीयकृत बँका अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराचे फोटो असणारे पासबुक, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला फोटोसहित अपंगत्वाचा दाखला, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखालील फोटो असलेले ओळखपत्र (मनरेगा जॉब कार्ड), निवृत्त कर्मचाऱ्यांची अथवा त्यांच्या विधवा / अवलंबित व्यक्ती यांची फोटो असलेली निवृत्ती वेतन विषयक कागदपत्रे उदा. पासबुक, प्रमाणपत्र इ., लोकसभा / राज्यसभा सचिवालय तसेच विधानसभा / विधानपरिषद सचिवालय यांनी आपल्या सदस्यांना दिलेले अधिकृत ओळखपत्र, स्वातंत्र्य सैनिकाचे फोटो असलेले ओळखपत्र, केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा योजनेचे फोटोसहित कार्ड, आधार कार्ड ही १२ ओळखपत्र मतदानासाठी ग्राह्य धरण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे.

''मतदान हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. मतदार ओळखपत्र हरवले किंवा उपलब्ध नसले तरी कोणताही मतदार वंचित राहू नये, म्हणून १२ पर्यायी ओळखपत्रांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदान हा लोकशाहीचा सण आहे. मतदारांनी १२ पैकी कोणतेही एक वैध ओळखपत्र घेऊन मतदानासाठी उपस्थित रहावे,'' असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# एकता पदयात्रेस बुलढाणाकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त बुलढाणा शहरात आज 'एकता पदयात्रा' उत्साहात पार पडली. एन.एस.एस. स्वयंसेवक, विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत या पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' या घोषणांनी शहर दुमदुमून गेले.



पदयात्रा जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली राजश्री शाहू कॉलेज ऑफ फार्मसी आणि माय भारत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. यावेळी राजश्री शाहू कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. शिरीष जैन, जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर, जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर, नेहरू युवा केंद्र धनंजय चाफेकर, जिल्हा एनएसएस समन्वय हनुमंत भोसले, प्रकाश केंद्रे, रोहित साळकुटे, दीपक भुसारी, भारत पवार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांनी हिरवा झेंडा दाखवून पदयात्रेला सुरुवात केली. पदयात्रेचा मार्ग राजश्री शाहू कॉलेज ऑफ फार्मसी-सुंदरखेड स्टॉप-कोठारी शोरूम-त्रिशरण चौक असा होता. पदयात्रमध्ये देशभक्तीपर गीते, भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणांनी शहर दुमदुमून गेले. पदयात्रेमध्ये एन.एस.एस. जिजामाता कॉलेज तसेच विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर म्हणाले, सशक्त, समृद्ध आणि आत्मनिर्भर भारतासाठी 'एकता' हा मूलभूत मंत्र प्रत्येकाच्या मनामनात रुजला पाहिजे. विद्यार्थ्यांनी मानसिक, शारीरिक व भावनिक दृष्ट्या समर्थ राहून देशाच्या प्रगतीत आपला वाटा उचलावा. सरदार पटेलांच्या नेतृत्वगुणांचा आदर्श घेतला तर देशाची प्रगती निश्चित आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निधी बोरकर व प्रांजली मापारी यांनी तर आभार रोहिणी जढाळ व मीनल गौर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आकाश चाफेकर, आकाश साळोखे, प्रशांत बनसोड यांनी विशेष परिश्रम घेतले.